.nagpur

# NMC e NEWS LETTER

ऑक्टोबर २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/


## थोडक्यात

### 'चला नागपूर' उपक्रमाचा महापौरांच्या हस्ते शुभारंभ

मनपा, महा मेट्रो व जीआयझेड इंडियाचा संयुक्त उपक्रम



नागपूर महानगरपालिका, महा मेट्रो व जीआयझेड इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'चला नागपूर' उपक्रमाचा गुरुवारी (ता. १) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते शुभारंभ झाला. शहरी विकास मंत्रालयातर्फे अर्बन मोबिलिटी इंडिया परिषदेच्या निमित्ताने 'पब्लिक आउटरिच डे' संकल्पनेंतर्गत दिवसभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या अंतर्गत जपानी गार्डन येथे सकाळी ७ वाजता महापौर नंदा जिचकार यांनी हिरवी झेंडी दाखवून वॉकथॉनला सुरूवात केली. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला चालणा देणे व जास्तीत जास्त नागरिकांनी सायकलचा वापर करावा या उद्देशाने ही संकल्पना राबविण्यात आली. या उपक्रमांतर्गत सेमिनरी हिल्स येथील वॉकर्स स्ट्रीट येथे सकाळी विविध फिटनेससंबंधी खेळ, झुम्बा डान्स व इतर स्पर्धा घेण्यात आल्या. याशिवाय विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीएनआयटी)चे प्रवेशद्वार व श्रद्धानंदपेठ चौकात 'पॉप अप पार्क'ची संकल्पना राबविण्यात आली. यावेळी एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून नागरिकांना सायलिंगचे महत्व पटवून देण्यात आले व नागरिकांना सायकल चालविण्याची शपथ देण्यात आली.

### स्मार्ट सिटीवर नगरसेवकांची कार्यशाळा

महापालिका व इक्की सिटी यांचा संयुक्त उपक्रम



नागपूर शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत. या कामांची नगरसेवकांना माहिती देण्यासाठी नागपूर महानगरपालिका, इक्की सिटी आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे उद्घाटन महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते करण्यात आले. स्मार्ट सिटीच्या यादीत नागपूरचे नाव दुस-या फेरीत आले.स्मार्ट सिटीच्या पॅन सिटी सोल्युशन्सअंतर्गत नागपूर शहरात विविध ठिकाणी सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. हा उपक्रम राज्यातील नव्हे तर देशातील पहिला उपक्रम आहे. उद्घाटनप्रसंगी महापौर नंदा जिचकार बोलताना म्हणाल्या, स्मार्ट सिटीमध्ये नागपूर शहरामध्ये नाव प्रविष्ठ झाल्यानंतर शहराचा विकास झपाट्याने वाढत आहे. नागपूर महानगरपालिकेद्वारे घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रकल्प, मलनिःस्सारण प्रक्रिया प्रकल्प हे जागतिक स्तरावर पथदर्शी ठरले आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत स्मार्ट वाहतूक, स्मार्ट बसस्थानके हे देखील उपक्रम महत्त्वकांक्षी आहेत. शाश्वत विकास हेच स्मार्ट सिटीचे प्रमुख उद्दीष्टे असून त्यानुसारच नागपूर शहराची वाटचाल स्मार्ट सिटीच्या दिशेने वेगाने होत आहे. आपण लोकप्रतिनिधींनी स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत जागरूक राहून नागरिकांना या प्रकल्पाबाबत अवगत करावे, असेही महापौर नंदा जिचकार यांनी सांगितले.

### शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी विज्ञान केंद्र उपयोगी ठरेल शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे यांचा विश्वास

एचसीएल आणि स्वप्नभूमी यांच्या सहकार्यातून साकारण्यात आलेल्या विज्ञान केंद्राचे उद्घाटन

नागपूर महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी विज्ञान केंद्र उपयोगी ठरतील, असा विश्वास शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे यांनी व्यक्त केला. नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने एचसीएल फाऊंडेशन व स्वप्नभूमी संस्थेच्या सहकार्याने महानगरपालिकेच्या रमाबाई आंबेडकर उच्च प्राथमिक शाळेत विज्ञान केंद्र तयार करण्यात आले. या विज्ञान केंद्राचे उद्घाटन बुधवारी (ता.२४) करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.पुढे बोलताना प्रा.दिवे म्हणाले, नागपूर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी हा गरीब कुटुंबातील आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी गुण असून त्याला बाहेर वाव मिळत नाही. विद्यार्थ्यांमधील गुणांना वाव मिळावा, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. अशा प्रकारच्या विज्ञान केंद्रातून महानगरपालिका शाळांतील विद्यार्थी घडतील असा मला विश्वास आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# घनकचरा व सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन साधल्यास शाश्वत विकासाची संकल्पना यशस्वी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन : १८व्या महाराष्ट्र महापौर परिषदेचे थाटात उद्घाटन



आजच्या २१ व्या शतकात आपल्यापुढील सर्वात मोठे आव्हानन अस्तित्वाचे आहे. वातावरणाच्या बदलाने जगात परिवर्तन होत आहे. यावर नियंत्रण मिळविणेही आपल्याच हातात आहे. आपल्याकडे उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर न केल्यास, त्याचे योग्य व्यंवस्थापन न केल्यास आपणच आपल्यावर संकट ओढवून घेणार आहोत. आज आपण प्रदुषणमुक्त, पर्यावरणपूरक शाश्वत विकासाची संकल्पना मांडतो. मात्र आपल्या शहरात जर घनकचरा व सांडपाण्याचे योग्य व्यकवस्थापन होत नसेल तर मूल्यमापनात आपण शून्य ठरतो. प्रदुषणमुक्त शहर हवे असेल तर आपण स्वतःच निर्माण केलेल्या कचऱ्याचे योग्य व्ययवस्थापन होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

१८व्या महाराष्ट्र महापौर परिषदेचे शनिवारी (ता. २७) वनामती येथील वसंतराव नाईक सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते थाटात उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज शाश्वत विकासाची रुजवणूक करण्याची आवश्यकता आहे. वातावरणाच्या बदलावर आपण कोणतिही कारवाई न केल्यास येत्या १० ते २० वर्षात जगाचे तापमान २ अंशाने वाढणार आहे. त्यामुळे पूर्णतः नैसर्गिक समतोल ढासळेल. नुकत्याच पॅरिस येथे झालेल्या बैठकीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शाश्वत विकासाबाबत खंबीर भूमिका मांडली. पंतप्रधानांनी शाश्वत विकासाचे काही संदर्भ स्वीकारून २०३० पर्यंत भारत यामध्ये पुढाकार घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यादृष्टीने आपण काम करणे आवश्यक आहे. १८व्यां महाराष्ट्र महापौर परिषदेच्या निमित्ताने शाश्वत विकास या विषयावर चर्चा होणे अभिनंदनीय आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.



# शिक्षणासोबतच नाविन्यपूर्ण कल्पनेवर भर देण्याची गरज

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विद्यार्थ्यांना उपदेश स्टार्ट अप फेस्टचे थाटात उद्‌घाटन

शिक्षणासोबतच नव्या नाविन्यपूर्ण कल्पनेला भर देण्याची गरज आहे. कौशल्यपूर्ण विकासावर भर कसा देता येईल यावरही विद्यार्थ्यांनी विचार करायला हवा, असा उपदेश केंद्रीय भूपृष्ठ परिवहन महामार्ग आणि जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी केला. नागपूर महानगरपालिका, इंडियन कॉन्सिल फॉर टेक्निकल रिसर्च ण्ड डेव्हल्पमेंट आणि नवयुवक इंटरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (ता.६) ला कविवर्य सुरेश भट सभागृहामध्ये स्टार्ट अप फेस्टचे उद्घाटन झाले. पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, जीवन जगताना काहीतरी करून दाखविण्याची इच्छाशक्ती मनामध्ये असायला हवी. इच्छाशक्तीपाठोपाठ आपण काय नाविन्यपूर्ण काम केले पाहिजे याचा देखील विचार करायला हवा. याच नाविन्यपूर्ण कल्पना आम्ही देखील राबविणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. कच-यापासून वीज निर्मिती, त्यापासून ऑर्गेनिक खत तयार करणार आहे. दिल्ली येथून ५० हजार टन खत आणून त्यावर रासायनिक प्रक्रीया करून तयार झालेले ते खत विदर्भातील शेतक-यांना देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मलनिःसारण प्रक्रीयेपासूनही इंधन तयार करण्याचा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. सांडपाण्यातून मिथेन गॅस निघतो. त्या मिथेन गॅसला रासायनिक प्रक्रीया करून बायो फ्युयेल तयार करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. पेट्रोल, डिजेलचे भाव गगनाला भिडले आहेत. म्हणून त्याला पर्यायी इंधन म्हणून इथेनॉलची निर्मिती करण्यात येणार आहे. विदर्भात निघणारे धानाचे तणसापासून इथेनॉल तयार करण्यात येणार आहे. १ टन तणसापासून सुमारे २८० लिटर इथेनॉल तयार करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

#### येत्या वर्षभरात ५० हजार युवकांना रोजगार

येत्या काही काळात नागपुरात मिहान विकसित होत आहे. मिहानमध्ये एचसीएल, टीसीएस, इनफोसिस यासारख्या नामांकित कंपन्या सुरू झाल्या आहेत. या कंपन्यांमार्फत येत्या वर्षभरात विदर्भातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाका-याने वर्षभरात ५० हजार युवकांना रोजगार निर्माण होणार असल्याचा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमात Building startup ecosysteam in Nagpur आणि Startup idea through Social media Glamour या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

### शाळांमधून आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात यावे : महापौर नंदा जिचकार

आपत्ती व धोके निवारण सप्ताह जनजागृती कार्यक्रम उत्साहात

आज नैसर्गिक व मानवनिर्मित अनेक संकट आपल्यापुढे उभे आहेत. आज मोठ्या प्रमाणात मानवनिर्मित आपत्तींमध्ये वाढ झाली. या संकटांचा सामना करण्यासाठी तसेच यापासून स्वतःचे व आपल्या समाजातील लोकांचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे. लहान मुले सांगितलेली कोणतिही गोष्ट विसरत नाहीत. त्यामुळे मुलांना शाळेपासूनच आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात यावेत, ज्यामुळे ते पुढे समाजात त्याची उत्तम प्रकारे जनजागृती करतील, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.नागपूर महानगरपालिका, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (ता. १२) सिव्हील लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आपत्ती व धोके निवारण सप्ताहांतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महापौर नंदा जिचकार पुढे म्हणाल्या, नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन विभाग कोणत्याही आपत्तीसाठी सदैव तत्पर असते. ६ एप्रिलला नागपुरात आलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. अशा स्थितीत अग्निशमन विभागाने चोख कामगिरी बजावत परिस्थिती योग्यरित्या नियंत्रणात आणली. शहरात उद्भवणाऱ्या आपत्तींसाठी अग्निशमन विभागासह नागरिकांनीही तत्पर राहण्याची गरज आहे. यासाठी नागरिकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. जनजागृतीशिवाय कोणतिही गोष्ट शक्य नाही, असेही महापौर नंदा जिचकार म्हणाल्या. आपल्यावर येणारे संकट टाळण्यासाठी नेहमी प्रशासनीक मदत मिळणार आहेच. मात्र आपत्तीचे प्रसंग येण्याची वेळच येऊ नये यासाठी नागरिकांनी जागरूक राहणे आवश्यक आहे. मनपातर्फे कचरा उचलला जातो, रस्ते झाडले जातात. मात्र एवढे करूनही नागरिकांच्या घरात जर डेंग्यूची लारवी आढळत असेल, तर नागरिकांनी आपली जबाबदारीही पार पाडणे आवश्यक आहे. कोणत्याही आपत्तीमध्ये जिवीत व वित्त हानी होउ नये यासाठी अशा कार्यक्रमाद्वारे जनजागृती करण्यात यावी, असेही महापौर नंदा जिचकार म्हणाल्या.

**आपत्ती व्यवस्थापनाबाबत जास्तीत जास्त जनजागृती व्हा्वी : जिल्हाधिकारी अश्विन मुदगल**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशान्वये संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केल्याप्रमाणे ९ ते १३ ऑक्टोबर हा आपत्ती व धोके निवारण आठवडा साजरा करण्यात येत आहे. शासनाने उचलेले हे महत्वाचे पाऊल असून याद्वारे आपत्तींचा कसा सामना करायचा याची माहिती लोकांपर्यंत पोहोचेल.



# डेंग्यू, मलेरिया रोगांवर योग्य उपाययोजना करण्याची गरज : आमदार डॉ.मिलिंद माने



### प्रशासनाद्वारे डेंग्यूबाबत केलेल्या उपाययोजनांचा घेतला आढावा

डेंग्यू, मलेरिया यासाराख्या रोगांवर योग्य उपाययोजना करण्याची गरज आहे. डेंग्यूचे प्रमाण दिवेंसदिवस वाढत आहे. त्यारोगांवर करावयाच्या उपाययोजनांची जनजागृती करणे अत्यावश्यक असल्याचे उत्तर नागपूरचे आमदार डॉ.मिलिंद माने यांनी सांगितले. सोमवारी (ता.२२) मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात डेंग्यूसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती.प्रारंभी आमदार डॉ.मिलिंद माने यांनी प्रशासनाकडून आढावा घेतला. जानेवारी २०१८ ते ऑक्टोबर २०१८ पर्यंत २४३ डेंग्यूसदृश्य रूग्ण आढळले आहेत. सप्टेंबर महिन्यात १५२ रूग्ण आढळले असल्याची माहिती मलेरिया व फायलेरिया विभागाच्या प्रमुख जयश्री थोटे यांनी दिली. याशिवाय ज्या-ज्या भागात डेंग्यूसदृश्य रूग्ण आढळले आहेत त्या-त्या भागात प्रभातफेरी काढणे, रोगाबाबत जनजागृती करणारी प्रदर्शनी आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जयश्री थोटे यांनी दिली. डास उत्पत्ती स्थानांवर गप्पी मासे सोडण्यात आले आहेत. याशिवाय फवारणीचे नियोजनदेखिल करण्यात आले असल्याची माहिती श्रीमती थोटे यांनी दिली. मोकळ्या भूखंडावर फवारणी, सार्वजनिक विहिरींमध्ये गप्पी मासे सोडण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. याव्यतिरिक्त संपूर्ण शहरामध्ये जनजागृतीसाठी सुमारे सहा लाख पत्रके वाटप केले असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.मिलिंद माने यांनी, ज्या भागात डेंग्यू सदृश्य रूग्ण आढळले आहेत, त्याभागातील नोंदणीकृत दवाखान्यांना नोटीस बजावण्यात यावी, परिसरात स्वच्छता मोहिम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात यावी, असे निर्देश दिले. ज्यांचे मोकळे भूखंड आहेत त्यांना नोटीस बजावण्यात याव्यात. त्यांनी आपला भूखंड स्वच्छ ठेवण्याचे काम तातडीने करावे, असे सांगत आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळण्याचे आवाहन नागरिकांना करावे, असेही निर्देश डॉ.मिलिंद माने यांनी केले. डॉक्टरांनी डेंग्यूच्या रूग्णांना याबाबत आश्वस्त करावे, रूग्णांचा आत्मविश्वास वाढविला पाहिजे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डेंग्यू या रोगाबाबात नागरिकांमध्ये जागरुकता आणण्याकरिता प्रयत्न केले पाहिजे. या रोगांवर काय उपाययोजना करावयाच्या याची जनजागृती मोठ्या प्रमाणावर करण्यात यावी, असे निर्देश डॉ.मिलिंद माने यांनी दिले.

# थोडक्यात...

## सेवा हाच धर्म या भावनेतून जबाबदारीने काम करा

महापौर नंदा जिचकार यांचे निर्देश :
दीक्षाभूमीवरील मनपाच्या नियंत्रण कक्षाचे उद्घाटन

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यातून दीक्षा भूमीवर येणाऱ्या बौद्ध अनुयायांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याची विशेष काळजी घेण्यात यावी. संपूर्ण दीक्षाभूमी परिसरात स्वच्छतेसह अनुयायांच्या आरोग्याबाबत काळजी घेताना सर्वांनी सेवा हाच धर्म या भावनेतून काम करावे, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त येणाऱ्या बौद्ध अनुयायांच्या सोयीसाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे चोखामेळा अण्णाभाऊ साठे चौक दीक्षाभूमी परिसरात उभारण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाचे बुधवारी (ता. १७) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. दीक्षाभूमी परिसरात सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात यावी. कोणतिही अनुसचित घटना घडू नये याची दक्षता घ्यावी. नागपूर महानगर पालिकेतर्फे तैनात स्वच्छता, अभियांत्रिकी, आरोग्य यासह विविध विभागांचे काम बौद्ध अनुयायांच्या सुविधेसाठी चोविस तास अविरत सुरू राहावे. याशिवाय कामामध्ये कोणत्याही प्रकारची कुचराई होणार नाही यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी जबाबदारी ओळखून कर्मचाऱ्यांकडून काम करून घ्यावे, बौद्ध अनुयायांची कसल्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊन कर्तव्य भावनेतून कार्य करा. दूरदूरून दीक्षाभूमीवर बौद्ध अनुयायी येत असतात. त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी, शिवाय स्वच्छतेच्या दृष्टीने फिरते व स्थायी शौचालयांचीही व्यवस्था राखली जाईल, याची काळजी घेण्याचेही महापौर नंदा जिचकार यांनी निर्देशित केले. यानंतर अपर आयुक्त श्री. अझीझ शेख व राम जोशी यांनी संबंधीत विभागाकडून करण्यात येत असलेल्या व्यवस्थेचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले तर आभार लक्ष्मी नगर झोनच्या सहायक आयुक्त सुवर्णा दखने यांनी मानले.

## मनपाच्या विद्यार्थ्यांचे सामाजिक संदेश देणारे नाटक राज्यस्तरावर

विद्यार्थी कलावंतांचा महापौरांनी केला गौरव



जिल्हा सातत्यपूर्ण व्यावसायिक शिक्षण अंतर्गत नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या 'कलादालन'ने सादर केलेले सामाजिक विषयावरील नाट्यप्रस्तुतीने राज्यस्तरावर झेप घेतली आहे. जिल्हा आणि विभागीय स्तरावर प्रथम पुरस्कार मिळविणाऱ्या या नाट्यकृतीतील विद्यार्थी कलावंतांचा सोमवारी (ता. २२) महापौर नंदा जिचकार यांनी गौरव केला.मनपा मुख्यालयातील महापौर कक्षात पार पडलेल्या कार्यक्रमात हा गौरव करण्यात आला. 'कुमारावस्था में बच्चों की स्वच्छंद दोस्ती' ह्या नाट्यप्रस्तुतीला जिल्हास्तरावर आणि विभागीय स्तरावर प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. जिल्हास्तरावर नागपूर शहरातील खासगी शाळांसह जिल्ह्यातील शाळांचाही सहभाग होता तर विभागीय स्तरावर चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, गोंदिया, तुमसर आदी ठिकाणच्या चमू सहभागी झाल्या होत्या. नागपूर महानगरपालिकेच्या चमूने सादर केलेल्या नाट्यप्रस्तुतीचे लेखन कलादालनच्या उपाध्यक्ष मधु पराड यांनी केले होते. तर दिग्दर्शन कलादालनचे प्रमुख सूर्यकांत मंगरूळकर आणि मधु पराड यांनी केले. मार्गदर्शक शिक्षकांसह सर्व कलावंतांचा सत्कार महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सर्व कलावंतांना प्रमाणपत्र व रोख रक्कम सत्काररूपात देण्यात आली. यावेळी बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांमध्ये अनेक गुण दडलेले आहेत. शिक्षक त्यांच्यावर मेहनत घेऊन त्यांच्यातील कलागुणांना प्रोत्साहन देत आहेत. परिणामी, विभागीय आणि राज्यस्तरावर हे विद्यार्थी यश प्राप्त करीत आहेत. महानगरपालिकेसाठी ही अभिमानाची बाब आहे. त्यांच्यातील कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर महानगरपालिका त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य करेल, असा विश्वास त्यांनी दिला. यावेळी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिका, क्रीडा व शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## थकीत पाणी बील व अवैध कनेक्शनबाबत मनपाचा कठोर पवित्रा

सोमवारपासून प्रशासन व पोलिसांच्या उपस्थितीत करणार कारवाई



थकीत पाणी बिल व अवैध नळ कनेक्शन याबाबत नागपूर महानगरपालिकेने कठोर पवित्रा घेतला असून सोमवार (ता. २२) पासून मनपा प्रशासन, जलप्रदाय विभाग, ओसीडब्लू आणि पोलिसांच्या उपस्थितीत कारवाई करण्यात येईल, असा इशारा जलप्रदाय समितीचे सभापती विजय (पिंटू) झलके यांनी दिला.थकीत पाणी बिल वसूली व अवैध नळ कनेक्शन संदर्भात सभापती विजय झलके यांच्या कक्षात शनिवारी (ता. २०) बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीला जलप्रदाय समिती उपसभापती श्रद्धा पाठक, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, जलप्रदाय विभागाचे उपअभियंता प्रदीप राजगिरे, मनोज गणवीर, ओसीडब्ल्यूचे राहुल कुळकर्णी, राजेश कारला प्रामुख्याने उपस्थित होते. यंदाच्या पावसाळ्यात पाऊस कमी पडल्याने जलाशयांमध्ये पाणीसाठा अत्यल्प आहे. त्यामुळे येणा-या उन्हाळ्यात शहरात पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. शहरात निर्माण होणा-या पाण्याच्या समस्येशी सामना करण्यासाठी आधीपासूनच तयारी करणे आवश्यक आहे. यासाठी आतापासून यांसंबंधी पाउल उचलणे आवश्यक आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर अवैध नळ कनेक्शन सुरू आहेत. या नळ कनेक्शनमुळे इतरांना पुरेसे पाणी मिळत नाही. या अवैध नळ कनेक्शन धारकांवर येत्या सोमवारपासून कठोर कारवाई करण्यात येईल. याशिवाय मोठ्या प्रमाणात नागरिकांकडे थकीत पाणी बील आहे. नागपूर महानगपालिकेने २०१६ व २०१७ या वर्षी पाणी कर अभय योजनेंतर्गत नागरिकांना थकीत पाणी बिलामध्ये सवलत दिली होती. मात्र यानंतरही पूर्णपणे पाणी कर जमा करण्यात आले नाही. त्यामुळे आता थकीत पाणी कर धारकांबाबत कोणतिही हयगय न करता थेट कारवाई करण्यात येईल. विशेष म्हणजे या कारवाईदरम्यान कोणतिही अनुचित घटना घडू नये यासझठी 'स्पेशल टास्क फोर्स' तैनात करण्यात आली असून या फोर्सच्या उपस्थितीतच ही कारवाई करण्यात येणार आहे, असेही जलप्रदाय समिती सभापती विजय झलके यांनी सांगितले. थकीत पाणी बिल धारकांवर होणारी कारवाई टाळण्यासाठी सर्वच थकीत पाणी कर धारकांनी संबंधित झोनमध्ये कर भरणा करून कारवाई टाळावी, असे आवाहनही सभापती विजय (पिंटू) झलके यांनी यावेळी केले.

# सरदार वल्लभभाई पटेलांनी दिलेल्या एकतेचा संकल्प सर्वांनी वृद्धींगत करण्याची गरज – नितीन गडकरी

मनपाद्वारे आयोजित एकता दौड : सतीश हलामी पुरूषामध्ये प्रथम तर महिलांमध्ये गीता चाचेरकर विजयी




सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिलेल्या एकतेचा संकल्प आपण सर्वांनी वृद्धींगत करण्याची आज गरज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. राष्ट्रीय एकता दिन म्हणजेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे एकता दौडचे आयोजन मंगळवार (ता.३१) रोजी संविधान चौकात करण्यात आले होते. त्याप्रसंगी तो बोलत होते. पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाला एक सूत्रात बांधण्याचे काम केले. देशाला एकतेचा मंत्र दिला. आपण सर्वांनीही जात, पंथ, धर्म याच्यावर विचार करून एकोप्याने रहायला हवे. एकतेनेच देश समृद्ध होईल. वल्लभभाई पटेलांनी दिलेला एकतेचा संकल्प आपण सर्वांनी अंगीकारावा, असेही नितीन गडकरी यांनी प्रतिपादित केले.

सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती ही राष्ट्रीय एकता दिन म्हणून सर्वत्र साजरी करण्यात येते. या पार्श्वभूमीवर सर्व देशभरात एकता दौडचे आयोजन करण्यात येते. नागपूर महानगरपालिकेतर्फेही या दौडचे आयोजन दरवर्षी करण्यात येत असते. नागपूर महानगरपालिकेद्वारे आयोजित करण्यात आले या दौडमध्ये सतीश हलामी हा पुरूष गटात तर गीता चाचेरकर ही महिला गटात विजयी झाली. पुरूष गटात सतीश हलावे प्रथम, ज्ञानेश्वर पदा द्वितीय, नितीन पुगाटी तृतीय तर महिला गटात गीता चाचेरकर प्रथम, दिव्या नखाते द्वितीय, काजल कान्हापूरे तृतीय विजयी ठरले. विजेत्यांचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ऑल इंडिया युनीव्हर्सिटी टुर्नामेंटमध्ये यशस्वी कामगिरी केल्याबद्दल प्राजक्ता गोडबोले व तिचे प्रशिक्षक सुनील कापगते यांचा सत्कार करण्यात आला. इंटरनॅशनल थलेटिक्स रेल्वे गेम्स मध्ये यशस्वी कामगिरी केल्याबद्दल मोनिका राऊत हिला देखील सन्मानित करण्यात आले. राष्ट्रीय उपविजेत्याचा किताब मिळवणा-या निखील शेंडेचाही गौरव या प्रसंगी करण्यात आला. कार्यक्रमाला शहरातील सर्व नगरसेवक व नगरसेविका प्रामुख्याने उपस्थित होते.

## रुग्णांचा सकारात्मक दृष्टिकोन हेच आपले यश : रवींद्र ठाकरे

टाटा ट्रस्टच्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांना कौशल्य प्रशिक्षण

टाटा ट्रस्टच्या साहाय्याने नागपूर महानगरपालिकेच्या वतीने संचालित नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कात टाकत आहेत. कर्मचारी तेच आहेत. फक्त त्यांचा कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. आरोग्य केंद्र अत्याधुनिक होत असतानाच कर्मचाऱ्यांची रुग्णांप्रति वागणूक बदलली की रुग्णांचाही दृष्टिकोन बदलतो. रुग्णांचा सकारात्मक दृष्टिकोन हेच आपले यश असल्याचे प्रतिपादन मनपाचे प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी केले.टाटा ट्रस्टच्या माध्यमातून नागपुरात साकारण्यात आलेल्या आदर्श नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. सदरमधील हॉटेल एल.बी. येथे सोमवारी (ता. २२) आयोजित प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे म्हणाले, प्राथमिक आरोग्य केंद्राने कात टाकली आहे. आरोग्य केंद्र अत्याधुनिक झाले आहे. शासकीय रुग्णालयांकडे बघण्याचा दृष्टिकोन यामुळे बदलला आहे. आता ही सेवा, ही स्वच्छता कायम राखण्याचे आव्हान आपल्यापुढे आहे. कौशल्य प्रशिक्षणाचा माध्यमातून कर्मचाऱ्यांचाही सेवेकडे आणि रुग्णांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल यात शंका नसल्याचे सांगत त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना उत्तम कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. अपर आयुक्त राम जोशी म्हणाले, मनपाच्या बदललेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राची केवळ रंगरंगोटीच झाली नाही तर येथील सेवेचा दर्जाही उंचावला आहे. आपण स्वत: रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांशी संवाद साधून माहिती घेतली. त्यांच्या चेहऱ्यावर असलेले समाधानाचे भाव हे आपण केलेल्या बदलाचे यश आहे. याबद्दल त्यांनी टाटा ट्रस्टचे आभार मानले. तत्पूर्वी आयुक्त रवींद्र ठाकरे व अन्य मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. टिकेश बिसेन यांनी टाटा ट्रस्टच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिका आरोग्य केंद्रामध्ये जे बदल घडवून आणले आणि त्यामुळे झालेले सकारात्मक परिणाम यावर आधारीत चित्रफीत दाखविली. या उपक्रमाबद्दलची माहिती उपस्थितांना दिली. मनपाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय जोशी यांनी प्रकल्पाविषयीची संपूर्ण माहिती दिली. टाटा ट्रस्टच्या सहकार्यातून नागपूर महानगरपालिकेचे २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र सर्व सुविधा युक्त करण्यात येणार आहेत. त्यापैकी आठ आरोग्य केंद्र सर्व सुविधांनी सुसज्ज झाले असून दुसऱ्या टप्प्यात १० आरोग्य केंद्रांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. नूतनीकरण होणाऱ्या प्रस्तावित १० नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी या प्रशिक्षण वर्गात सहभागी झाले होते. यानंतर सुरू झालेल्या प्रशिक्षण वर्गात डॉ. सतीश जयराम यांनी रुग्णांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला तर काय परिणाम होऊ शकतात याबाबत विवेचन केले. कुठलाही बदल एकदम घडून येत नाही. त्याचा वेळ तो घेत असतो. एक वर्षापूर्वी आरोग्य केंद्राची असलेली अवस्था आज बदलली आहे. या वेळेत सर्व चमूने जे परिश्रम घेतले त्या परिश्रमाचे हे फळ असल्याचे त्यांनी सांगितले. याच बदलाची प्रेरणा आपल्या चांगले काम करण्याची ऊर्जा देते. कुठलीही समस्या आपली समजून ती सोडविण्याचा प्रयत्न करा. समस्येकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला तर त्यावरील उपाय सहज मिळतात, असे सांगत उपस्थित कर्मचाऱ्यांना रुग्णांशी सौजन्याने वागण्याचे आवाहन केले. यानंतर विविध सत्रात श्री. अरुलमानी आणि डॉ. मिना सिन्हा यांनी विविध विषयांवर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले. प्रशिक्षण वर्गाला प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी, परिचारिका आणि कर्मचारी उपस्थित होते.

## गोवर रूबेला लसीकरण मोहिम यशस्वीपणे राबविण्यात यावी

प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे : जिल्हास्तरीय टास्क फोर्सची बैठक

गोवर रूबेला लसीकरण मोहिम यशस्वीपणे राबविण्यात यावी. मोहिमेसाठी अधिका-यांना दिलेल्या जबाबदारीचे तंतोतंत करावे. कामाममध्ये कुठलाही हलगर्जीपणा चालणार नाही, असे निर्देश प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी दिले. शनिवारी (ता.६) मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीत मिझेल्स रूबेला लसीकरणाच्या जिल्हास्तरीय टास्क फोर्सची बैठक आयोजित करण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी लसीकरण मोहिमेसंदर्भात प्रशासनाच्या तयारीचा आढावा घेतला. ही मोहिम यशस्वीपणे राबविण्यात यावी, अधिका-यांना, कर्मचा-यांना दिलेल्या जबाबदारीचे तंतोतंत पालन करण्यात यावे, असे निर्देश दिले. शाळांच्या मुख्याधापकांचे व केंद्र प्रमुखांचे लसीकरण मोहिमेसंदर्भातील प्रसिक्षण ११ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर दरम्यान घेण्यात यावे, असेही निर्देश रवींद्र ठाकरे यांनी दिले. सर्व शाळांची माहिती शिक्षणाधिका-यांनी पुढील काही दिवसात प्रशासनाकडे द्यावी, असेही श्री. ठाकरे यांनी सांगितले. ही लसीकरण मोहिम यशस्वी करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, एनजीओ यांनी पुढाकार घेऊन महापालिकेला सहाकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. गोवर रूबेला लसीकरण मोहिम नोव्हेंबर महिन्यात आयोजित करण्यात येत आहे. ही लस महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये, सरकारी दवाखान्यामध्ये ही लस ९ महिन्यांचे बाळ ते १५ वर्षाच्या मुला मुलींना देण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाद्वारे देण्यात आली. मान्यवरांचे आभार वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनील धुरडे यांनी केले.

## जनसेवेचा वसा आयुष्याच्या उत्तरार्धातही स्वीकारावा: रवींद्र ठाकरे

उपायुक्त देवतळे, सहायक आयुक्त राजेश कराडे यांच्यासह १८ अधिकारी-कर्मचाऱ्यांना निरोप

आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यात जनसेवेचे कार्य करून आपल्या कार्याची छाप जनमानसावर सोडणारे अधिकारी फार थोडे असतात. उपायुक्त रवींद्र देवतळे आणि सहायक आयुक्त राजेश कराडे हे अशाच अधिकाऱ्यांपैकी एक आहेत. त्यांनी सेवानिवृत्तीनंतर आयुष्याच्या उत्तरार्धातही जनसेवेचे कार्य अविरत सुरू ठेवावे, असे प्रतिपादन नागपूर महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त रवींद्र देवतळे यांनी केले.नागपूर महानगरपालिकेचे उपायुक्त रवींद्र देवतळे यांच्या स्वेच्छानिवृत्ती आणि नेहरूनगर झोनचे सहायक आयुक्त राजेश कराडे यांच्यासह मनपाच्या १८ अधिकारी-कर्मचाऱ्यांना बुधवारी (ता. ३१) मनपाच्या वतीने निरोप देत सेवानिवृत्ती सत्कार करण्यात आला. मनपा मुख्यालयातील सभागृहात आयोजित या सत्कार कार्यक्रमात ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. पुढे बोलताना प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे म्हणाले, नागपूर महानगरपालिकात कार्य करताना अधिकारी-कर्मचाऱ्यांना ताण असतो. मात्र याठिकाणी या दोन्ही अधिकाऱ्यांनी आनंदाने कार्य केले. आपल्या कार्यातून इतरांनाही आनंद दिला. आपली प्रत्येक जबाबदारी त्यांनी चोखपणे पार पाडली. हसतखेळत काम करण्याची कला त्यांच्याकडून शिकण्यासारखी आहे, या शब्दात त्यांनी दोन्ही अधिकाऱ्यांचा गौरव केला. तत्पूर्वी प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे, अपर आयुक्त राम जोशी यांच्या हस्ते दोन्ही अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# शाळांच्या गतिमानतेचा शिक्षण सभापती दिलीप दिवे यांनी घेतला आढावा

निरिक्षकांनी दिला शाळा तपासणीचा अहवाल : समितीचे सदस्य देणार आकस्मिक भेटी



नागपूर महानगरपालिकेच्या शाळांना अधिक सक्षम आणि गतिमान बनविण्याच्या दृष्टीने शाळा निरीक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. शाळा निरीक्षकांनी वेळोवेळी शाळांना भेटी देऊन तेथील शिक्षकांच्या कार्याचा अहवाल शिक्षण समिती आणि विभागाला द्यावा. जे शिक्षक शिक्षणकार्यात कुचराई करीत असेल त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी, असे निर्देश शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी दिले.नागपूर महानगरपालिका शाळांच्या शिक्षण कार्यातील गतिमानतेचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी (ता. ३०) शिक्षण समितीच्या बैठकीचे आयोजन मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात करण्यात आले होते. यावेळी सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी शाळा निरीक्षकांकडून त्यांच्या कार्याचा झोननिहाय आढावा घेतला. नागपूर महानगरपालिकेअंतर्गत संचालित सर्व शाळांमध्ये शिक्षण साहित्य व्यवस्थित आहे अथवा नाही, शिक्षकांचे कार्य योग्यरीत्या आहे अथवा नाही, शिक्षक टाचणवह्यांची नोंद ठेवतात की नाही, शिक्षकांच्या मासिक नोंदी, वार्षिक नियोजन आहे अथवा नाही, त्यावर शाळा निरीक्षकांच्या स्वाक्षऱ्या आहेत की नाही, या सर्व बाबींचा आढावा घेतला. दैनंदिन कामे करण्यात जो शिक्षक कुचराई करीत असेल, त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देश सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी दिले.

**समिती सदस्य करणार शाळांची तपासणी**

मनपाच्या शाळा अधिक गतीमान करण्यासाठी आता सभापती प्रा. दिलीप दिवे यांच्यासह प्रत्येक सदस्य हे संबंधित झोनच्या शाळा निरीक्षकांसह विविध शाळांना आकस्मिक भेटी देणार आहेत. या भेटीत ते शिक्षकांच्या कार्याचा आढावा घेतील. त्यांची दैनंदिन कामे योग्यरीत्या होतात अथवा नाही, याचीही ते तपासणी करतील. शाळा साहित्य, शालोपयोगी वस्तू योग्यरीत्या असल्याची खातरजमाही ते या भेटींमध्ये करणार आहेत.

# बंद पथदिव्यांच्या मार्गातील अडचणी दिवाळीपूर्वी दूर करा : महापौर नंदा जिचकार



नागपूर शहराच्या बहुतांश प्रभागातील अनेक पथदिवे बंद आहेत. न्यायालयीन प्रक्रियेत काही बाबी अडकल्या असल्या तरी त्यावर मध्यमार्ग काढा. दिवाळीपूर्वी बंद असलेले पथदिवे सुरू करा, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या नेहरूनगर झोन, हनुमाननगर झोन आणि धंतोली झोनमधील बहुतांश प्रभागातील अनेक पथदिवे बंद असलेल्या नागरिकांच्या तक्रारींवरून आमदार सुधाकर कोहळे यांनी महापौर नंदा जिचकार यांना निवेदन दिले होते. याच निवेदनाच्या अनुषंगाने मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात संबंधित झोनअंतर्गत येणाऱ्या प्रभागातील नगरसेवक आणि अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत त्या बोलत होत्या. सदर बैठकीत उपस्थित सर्व नगरसेवकांनी पथदिवे बंद असल्यासंदर्भात नागरिकांच्या तक्रारी असल्याचे सांगितले. दररोज नागरिक यासंदर्भात तक्रारी करतात. मात्र, विद्युत विभागाकडून यासंदर्भात समाधानकारक उत्तर मिळत नाही. यासंदर्भात बोलताना कार्यकारी अभियंता संजीव जयस्वाल यांनी हा प्रश्न निर्माण होण्यात काही तांत्रिक अडचणी असल्याचे सांगितले. परंतु यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बसून तातडीने तोडगा काढण्यात येईल, असेही ते म्हणाले. यासंदर्भात बोलताना महापौर नंदा जिचकार यांनी पथदिवे बंद असल्याच्या मार्गातील सर्व अडचणींवर तातडीने तोडगा काढून दिवाळीपूर्वी बंद असलेले पथदिवे सुरू करा, असे निर्देश दिले. बैठकीला संबंधित झोनमधील उपअभियंता उपस्थित होते.